जा.क्र.कनपं/बा.वि./ 372/ 2026-27
कणकवली नगरपंचायत, कणकवली
दिनांक : 12/05/2026

## ई - निविदा सुचना क्र.1 सन 2026-27

कणकवली नगरपंचायत अंतर्गत सन 2026-27 या वर्षाकरिता खालील नमुद केलेले कामाकरिता ई निविदा पद्धतीने ई-निविदा दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | दर | बयाणा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | कामाची मुदत | निविदेची शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 7 | 8 |
| 1 | कणकवली शहर पाणीपुरवठा व भुयारी गटर योजना राबविणे कामी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार (PMC) नियुक्ती करणे. | शासन निर्णयानुसार 2% अथवा 3% | 10,000/- | 8% बिलातून कपात | 2 वर्ष | 3000/- |

### ई - निविदा प्रक्रियेचा दिनांक व वेळेचा तपशिल

| अ.क्र | प्रकियेचा तपशील | पासुन | | पर्यंत | |
|---|---|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
| 1. | निविदा प्रसिध्दी | 13/05/2026 | स.10.00 वा. पासून | 13/05/2026 | 18.00 वाजेपर्यंत |
| 2. | निविदा डाऊनलोड करणेचा कालावधी | 13/05/2026 | स.10.00 वा. पासून | 21/05/2026 | 18.00 वाजेपर्यंत |
| 3. | निविदापुर्व चर्चा बैठक | - | - | - | - |
| 4. | निविदा ऑनलाईन भरणेचा अंतिम दिनांक | 13/05/2026 | स.10.00 वा. पासून | 21/05/2026 | 18.00 वाजेपर्यंत |
| 5. | ऑनलाईन तांत्रिक व वित्तय बोलीचा लिफाफा उघडण्याचा दिनांक ( शक्य झाल्यास ) | 25/05/2026 | स.10.00 वा. पासून | 25/05/2026 | 18.00 वाजेपर्यंत |
| 6. | ऑनलाईन निविदा उघडयाचे स्थळ | मा. मुख्य अधिकारी, कणकवली नगरपंचायत यांचे दालनात उपस्थित कंत्राटदार अथवा अधिकृत प्रतिनिधी समक्ष | | | |

## अटी व शर्ती

| | |
|---|---|
| 1) | सर्व पात्र इच्छुक कंत्राटदार यांनी www.mahatenders.gov.inया संकेत स्थळावर नोंदणीकृत असणे अनिवार्य आहे. |
| 2) | ई – निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी कंत्राटदाराने प्रथम डिजीटल सिग्नेचर सर्टीफिकेट (DSC) युजर आय. डी. व पासवर्ड करुन घेणे आवश्यक आहे. |
| 3) | वरील कामाची निविदा प्रक्रिया ई- निविदा प्रक्रियेद्वारे ऑनलाईन कण्यात येत असून या निविदेसंबंधी यापुढील सर्व सूचना /शुध्दीपत्रके www.mahatenders.gov.inया वेबसाईटच्या माध्यमातून ऑनलाईन करण्यात येतील. |
| 4) | वरील कामाबाबत संपूर्ण माहिती www.mahatenders.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| 5) | ऑनलाईन निविदा सादर करताना तांत्रिक लिफाफा नं. 1 (Envelop No. 1) मध्ये खालील प्रमाणे कागदपत्रे अपलोड करावयाची आहेत. तसेच वर नमुद केल्याप्रमाणे सदरच्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती व निविदा फॉर्म फी व बयाणा रक्कमेचे RTGS/NEFT द्वारे भरले बाबतचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र संबधित NEFT चा युनिक टरझाक्शन नंबर (UTR) नोंदवून सदरची पावती ऑनलाईन अपलोड आवश्यक आहे. |
| | अ) प्रत्येक कामाच्या निविद सादर करताना वरील रकाना क्र.4 मध्ये दर्शविलेल्या बयाणा रक्कमेचा मुख्याधिकारी, कणकवली नगरपंचायत यांचे नांवे राष्ट्रीयकृत बँकेच्या कणकवली येथे देय असलेल्या खाते क्रमांक ३४४४२१६३३७९ ऑनलाईन पद्धतीने रक्कम भरणा करून सदर (UTR) नंबर नोंदवून सदरची पावती ची स्कॅन प्रत अपलोड करावी लागेल. |
| | ब) प्रत्येक कामाच्या निविदा सादर करताना वरील रकाना क्र.8 मध्ये दर्शविलेल्या निविदा किंमतीच्या रक्कमेचा मुख्याधिकारी, कणकवली नगरपंचायत यांचे नांवे राष्ट्रीयकृत बँकेच्या कणकवली येथे देय असलेल्या खाते क्रमांक ३४४४२१६३३७९ ऑनलाईन पद्धतीने रक्कम भरणा करून सदर (UTR) नंबर नोंदवून सदरची पावती ची स्कॅन प्रत अपलोड करावी लागेल. |
| | क)निविदाधारकाने अनुभवाचे दाखले, आयकर नोंदणी प्रमाणपत्र, चालू आर्थिक वर्षामधील (सन 2023-24) व्यवसाय कर भरणा केलेबाबतचे चलन सत्यप्रत, पॅनकार्ड व जी.एस.टी. प्रमाणपत्र इत्यादींच्या सत्यप्रती अपलोड कराव्या लागतील. |
| | ड) निविदा प्रपत्रातील विहीत नमुन्यातील (Appendix – A) व (Appendix – B) Declaration of Contractor स्वत:च्या पत्र लेखनाच्या मजकुरावर,तसेच यासोबत स्वयंघोषणापत्र B1 नमुन्यामधील पृष्ठ क्रमांक 14 मधील नमूद नमुन्यानुसार रु.500 च्या सत्यप्रतिज्ञालेखावर मा. कार्यकारी दंडाधिकारी, यांचे समक्ष केलेली प्रत अपलोड करावी लागेल. तसेच विहीत नमुन्यातील स्टेटमेंट 1 ते 4 आवश्यक त्या तांत्रिक अहर्ता प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र, मुळ कागदपत्रांची रंगीतस्कॅन प्रत अपलोड करावी लागेल |
| 6) | मंजूर निविदाधारकाने निविदांचे कामाचे किंमतीनुसार योग्य त्या स्टॅम्पपेपरवर करारनामा करुन देणे बंधनकारक आहे. |
| 7) | निविदाधारकाने एकदा ऑनलाईन भरलेली निविदा कोणत्याही परीस्थितीत मागे घेता येणार नाही तसे केल्यास निविदेसोबत भरणा केलेली बयाणा रक्कम जप्त करण्याचा व संबधीत निविदाधारकावर कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार मा.मुख्यअधिकारी नगरपचायत- कणकवली यांनी राखून ठेवलेला आहे. |
| 8) | कोणत्याही परिस्थितीत Price Escalation देण्यात येणार नाही |
| 9) | सदर कामाची निविदा मंजूर झाल्यानंतर शासकीय विमा योजना, कामगार कल्याण उपकर व इतर आवश्यक त्या कपाती देयकातून करण्यात येतील. |
| 10) | सदर निविदेतील कामाबाबत कोणतेही कारण न देता कोणतीही अथवा सर्वच निविदा नाकारण्याचा हक्क नगरपरिषदेने राखून ठेवला आहे. |
| 11) | निविदाधारक यांनी निवेदेमध्ये दिलेले दर निविदा उघडलेच्या दिनांका पासुन 120 दिवसांपर्यंत ग्राहय रहातील. |
| 12) | निविदा सूचना ही कामाच्या करारनाम्याचा भाग राहील. |
| 13) | पार्टनरशीप असेल तर पॉवर ऑफ अटर्नी बाबत .सदर कामकरीता निविदाधारक यांचेवतीने कुलमुखत्यार यांनी निविदा सादर केल्यास त्याबाबतचे आवश्यक सर्व कागदपत्रे (नोंदणीकृत कुलमुखत्यार इत्यादी ) निविदे सोबत सादर करणे निविदाधारक यांजवर बंधनकारक राहील. |
| 14) | निविदेसोबत सादर करण्यात येणारे निविदा दर व सत्य प्रतिज्ञापत्र निविदा धारक उक्त निविदेच्या कामाच्या स्वरूपाचा, आराखड्यांचा पूर्ण अभ्यास करून तसेच कामगार साहित्य उपलब्धता इत्यादी बाबी विचारात घेऊन कामाचे दर व प्रतिज्ञा पत्रसादर केल्याचे गृहीत धरण्यात येईल. |
| 15) | इतर निविदा दारांची नामंजुर बयाणा परत करणे बाबत |

| | |
|---|---|
| 16) | कामाच्या मुदतीत काम न केल्यास कमीत कमी रु.100/- प्रतीदिन किंवा जास्तीत जास्त अंदाजपत्रकिय रक्कमेच्या 10%रक्कम दंड स्वरुपात आपल्या देयकातून कपात करण्यात येईल. विहित मुदतीत काम पूर्ण न केल्यास कोणतीही मुदत वाढ देण्यात येणार नाही. आणिबाणीच्या स्थितीत उक्त निविदेस मुदत वाढ दिल्यास मंजूर निविदा धारकास पूर्व मंजूर दराने काम करणे बंधनकारक राहिल. |
| 17) | नियमानुसार शासकिय कपाती करण्यात येतील. |
| 18) | निधीच्या उपलब्धतेनुसार देयक अदा करण्यात येईल. |
| 19) | उपरोक्त नमूद कामाकरीता भरणा करण्यात आलेली सुरक्षा अनामत रक्कम परताव्याचा दोष दायित्व कालावधी हा शासन निर्णयामधील नमूद कालावधीप्रमाणे राहील. सदरची रक्कम विहित कालावधी संपल्यावर कंत्राटदारास प्रदान करण्यात येईल. |
| 20) | निविदाधारकाने कणकवली नगर पंचायतीचे हितास बाधा पोहचेल असे कोणतेही वर्तन केल्याचे तसेच विहित मुदतीत सेवा न दिल्याचे आढळून आल्यास सदर निविदाधारकाने जमा केलेली बयाणा रक्कम व अनामत रक्कत कोणतेही पूर्व सूचना न देता जप्त करण्याचा व सदर ठेका रद्द करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवला आहे. |
| 21) | ई निविदा बयाणा रक्कम व निविदा प्रपत्र रक्कम भरणे अनिवार्य राहील. या मध्ये कोणत्याही प्रकारची सूट वजा सवलत ग्राह्य धरली जाणार नाही याची सर्व निविदाधारकांनी नोंद घ्यावी. |
| 22) | नगरपंचायतीने मागणी केलेल्या कालावधीसाठी सेवा पुरविणे बंधनकारक राहील. |
| 23) | सदर कामाची निविदा मंजूरझाल्यानंतर शासकीय विमा योजना, कामगार कल्याण उपकर व इतर आवश्यक त्या कपाती तसेच सर्व सुधारित शासकीय कर भरणा करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित ठेकादारची राहील. |
| 24) | नगरपंचायतीस अपेक्षित असलेल्या मानकानुसार सेवा पुरविणे संबधित मक्ते दारास बंधनकारक राहील. |
| 25) | सदर कामाबाबत न्यायालयीन क्षेत्र कणकवली राहील. |
| 26) | निविदाधारक यांनी उपरोक्त नमूद कामाकरिता लागू असल्यास सेवा कर भरणे बंधनकारक आहे. |
| 27) | प्रस्तुत कार्यासंबंधी कोणताही वाद अथवा तक्रार झाल्यास मक्ता रद्द करण्यात येईल आणि या बाबत कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही. |
| 28) | उपरोक्त कामाच्या लेखापरीक्षणा मध्ये कोणतेही मुद्दे उपस्थित झाल्यास त्याची पूर्तता करणे संबधित मक्तेदारास बंधनकारक राहील. |
| 29) | एक अथवा सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याच्या अधिकार नगर पंचायतीने राखून ठेवला आहे. नाकारलेल्या निविदांची/ दरपत्रकांची कोणतीही तोंडी अथवा लेखी कारणे दिली जाणार नाहीत. तसेच उक्त निविदा सुचनेमधील कोणतीही अट रद्द करण्याचा अथवा शिथिल करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवला आहे. |
| 30) | कामाची व्याप्ती व स्वरूप याची संपूर्ण माहिती नगरपंचायत कार्यालयात बांधकाम विभाग कडून प्राप्त करून घ्यावयाची आहे. व तद्नंतर निविदा भरावयाची आहे. मागाहून कोणतीही तक्रार एकूण घेतली जाणार नाही. |
| 31) | सदर कामामध्ये प्राथमिक स्थळ पाहणी, सर्व्हे, प्राथमिक आराखडा व अंदाजपत्रक, मा.मुख्य अधिकारी सादर करणे, तदनंतर अंतिम आराखडे व अंदाज पत्रक तयार करणे, Drawing, आराखडे प्राकलने सादर करणे, अंदाज पत्रक व आराखड्यास तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक असल्यास आराखड्यांचे सादरीकरण करणे, अंदाज पत्रकातील तरतुदी नुसार कामाची अंमलबजावणी करणे, देखरेख व निरीक्षण करणे, मोजमाप पुस्तकामधील नोंदी घेणे, देयके सादर करणे, कामाचा गुणवत्ता अहवाल सादर करणे, काम पूर्णत्वचा दाखला सादर करणे इत्यादी अनुषंगिक कामे अंतर्भूत आहेत. |
| 32) | मंजूर निविदाधारकाने प्रकल्प पूर्ण होई पर्यंत सेवा पुरविणे बंधनकारक राहील. कोणत्याही परिस्थितीत प्रकल्प पूर्ण होई पर्यंत स्वताहून सेवा खंडित करता येणार नाही. |

कणकवली नगरपंचायत
कणकवली

**मुख्याधिकारी**
**कणकवली नगरपंचायत**

Signature Not Verified
Digitally signed by Satish Shankar Kamble
Date: 2026.05.12 14:45:59 IST
Location: Maharashtra-MH